# 'आरे'तील रेल भवनातून मुंबई मेट्रोचे नियंत्रण

## एमएमआरडीएने काढल्या निविदा

मुंबई, ता. २६ : एमएमआरडीएच्या वतीने आरे कॉलनीत उभारण्यात येणाऱ्या मेट्रो रेल भवनातून मुंबई मेट्रोचे संपूर्ण संचालन आणि नियंत्रण केले जाणार आहे. आगामी काळात मेट्रोचे संचालन व नियमन एकाच ठिकाणहून करणे गरजेचे असल्यामुळे फक्त ३६ महिन्यांच्या आत भवन उभारले जाईल.

आरे कॉलनीत आठ हजार चौरस मीटरवर मेट्रो रेल भवन बांधण्यात येणार आहे. ३२ मजली इमारतीत मेट्रो नियंत्रण कक्ष आणि मेट्रो रेल्वेच्या एकूण १३ लाईनच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण अकादमी असेल. मुंबईत सध्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो-१ मार्ग सुरू आहे. दहिसर पूर्व ते डी. एन. नगर (मेट्रो २ ए), डी. एन. नगर ते मंडाळे (मेट्रो २ बी), कुलाबा-वांद्रे-सिप्झ (मेट्रो-३), वडाळा-घाटकोपर- मुलुंड-ठाणे-कासारवडवली (मेट्रो ४), ठाणे-भिवंडी-कल्याण (मेट्रो ५), स्वामी समर्थनगर-जोगेश्वरी-विक्रोळी (मेट्रो ६) आणि दहिसर पूर्व-अंधेरी पूर्व (मेट्रो ७) मार्गांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. आगामी काळात मेट्रोचे संचालन व नियमन एकाच ठिकाणहून करणे गरजेचे होणार आहे. त्यासाठीच्या निविदा एमएमआरडीएने काढल्या असून इच्छुकांना १५ एप्रिलपर्यंत त्या भरता येणार आहेत. १८ एप्रिलला निविदा उघडल्या जातील.

### १०० कोटींचा निधी

**राज्य सरकारने मेट्रो रेल भवनाच्या उभारणीसाठी २०१९-२० च्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपये एमएमआरडीएला देण्याचे मंजूर केले आहे. मेट्रो-७ आणि मेट्रो २ ए अशा दोन सेवा २०२० पर्यंत कार्यान्वित करण्याचा एमएमआरडीएचा विचार आहे. दोन मेट्रो प्रकल्पांचे सिव्हिल वर्क वर्षअखेर पूर्ण होईल, असा अंदाज आहे.**

